अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई – ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

दिनांक :– ०५/०४/२०२६

# प्रेसनोट

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०८/२०२६ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | विलास ज्ञानोबा लाड, कक्ष अधिकारी ( वर्ग १), मंत्रालय, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. ६,३७,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. ६,३७,०००/– |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे गावाचे मुलभूत सुविधांचे विकास कामाकरीता शासकीय निधी मंजूर करण्याच्या कामाकरीता त्यांचे गावाचे सरपंच यांनी तक्रारदार यांना अधिकारपत्र दिले होते. सदरचा शासकीय निधी मंजूर करून घेण्याकरीता तक्रारदार हे मंत्रालय, मुंबई येथे ये–जा करीत होते. मंत्रालय, मुंबई येथे काम करणारे लोकसेवक विलास लाड, कक्ष अधिकारी यांनी तक्रारदार यांचे गावाच्या मुलभूत सुविधांचे विकास कामाकरीता २५/१५ व अल्पसंख्याक योजनेअंतर्गत शासकीय निधी मंजूर करून देण्याकरीता तक्रारदार यांचेकडे रू. ६,३७,०००/– लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकाला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०९/०३/२०२६ रोजी ला.प्र.वि., मुंबई विभाग कार्यालयात समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १६/०३/२०२६ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे गावाचे मुलभूत सुविधांचे विकासकामाकरीता २५/१५ व अल्पसंख्याक योजनेअंतर्गत शासकीय निधी मंजूर करून देण्याकरीता तक्रारदार यांचेकडे रू. ६,३७,०००/– लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक ०५/०४/२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रू. ६,३७,०००/– स्विकारताना खारघर, नवीमुंबई येथे रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून त्यांचेविरूध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |

**सापळा अधिकारी :** प्रमोद सुर्वे, पोलीस निरीक्षक, **पर्यवेक्षक अधिकारी :** सागर आरगडे, पोलीस निरीक्षक

( अजित सुळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क – लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३०
संकेतस्थळ – acbmaharastra.gov.in,
ईमेल – 1)acbwebmail@mahapolice.gov.in, 2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार अर्ज – www.acbmaharastra.net. टोल फ्रि. क्र. 1064
दुरध्वनी क्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९२८२४९०६४